विशेष/ध.आ./मु.सा.वि./२म.

No.

12511

# नोंदणीचे प्रमाणपत्र

याद्वारे प्रमाणपत्र देण्यात येते की, खाली वर्णन केलेली सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था ही आज, मुंबई सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था अधिनियम, १९५० (सन १९५० चा मुंबई अधिनियम क्रमांक २९) या अन्वये ........ चंद्रपूर ........ येथील सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था नोंदणी कार्यालयात योग्य-रीतीने नोंदण्यात आलेली आहे.

सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थेचे नाव ...... किरण फाऊंडेशन चंद्रपूर, ता+जि - चंद्रपूर ......

सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थांच्या नोंदणी पुस्तकातील क्रमांक ...... एफ - 13371 (चंद्रपूर)

...... श्री. मिलिंद माणिक डोंगरे ...... यांस प्रमाणपत्र दिले.

आज दिनांक 28/08/2014 रोजी माझ्या सहीनिशी दिले.

शिक्का

सही ...... [signature] 28/08/14

सहाय्यक धर्मादाय आयुक्त
पदनाम चंद्रपूर विभाग, चंद्रपूर

विशेष-व. अ./मु. सा. वि/५० अ

~~№ 020682~~

सत्यमेव जयते

# नोंदणी प्रमाणपत्र

संस्था नोंदणी अधिनियम, १८६०

(१८६० चा अधिनियम २१)

महा/५८/१४
चंद्रपूर.

नोंदणी क्रमांक

याद्वारे असे प्रमाणित करण्यात येते की, किरण फाऊंडेशन चंद्रपूर

यांची आज रोजी संस्था नोंदणी अधिनियम, १८६० (सन १८६० चा अधिनियम २१) अन्वये योग्यरित्या नोंदणी करण्यात आली.

तारीख १६/०२/२०१४ २० रोजी माझ्या सहीनिशी दिले.

REGISTRAR OF SOCIETIES * MAHARASHTRA STATE
रजिस्ट्रार ऑफ सोसायटीज
महाराष्ट्र स्टेट

२४/३/१४

संस्थांचे सहायक निबंधक.
सहायक संस्था निबंधक
चंद्रपूर विभाग, चंद्रपूर

... copy was applied for on 07/04/14
The copy was ready for delivery on 29/5/14
The copy was delivered & the endorsement made on 03/7/14
Superintendent 3/07/14
Public Trust Registration Office
Chandrapur Region Chandrapur

Registered Under Societies Registration ... No. MA ... Dt. ...
A. R. S.

- :: परिशिष्ट - ब :: -

# "किरण फाऊंडेशन, चंद्रपूर"

या संस्थेचे

## -:: मेमोरँडम ऑफ असोसिएशन ::-

१) संस्थेचे नांव :- **"किरण फॉऊंडेशन, चंद्रपूर"**

२) संस्थेच्या कार्यालयाचा पत्ता :- द्वारा :- **सौ. विश्रांती दिलीप खोब्रागडे,** सिस्टर कॉलनी, नगीनाबाग, चंद्रपूर

### ३) संस्थेचे ध्येय्य व उद्देश :-

**सामाजिक उद्देश :-**

१ सामाजिक जागृती निर्माण करण्यासाठी सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करणे. त्याद्वारे लोकांमध्ये देश तथा समाजाच्या समोर असलेल्या समस्यांविषयी जागृती निर्माण करणे.सांस्कृतिक कार्यक्रमाद्वारे येणारे उत्पन्नाचा उपयोग संस्थेच्या हितासाठी तथा समाज कल्याणासाठी वापरणे. सामाजिक विवाह मेळाव्यांचे आयोजन करुन निशुल्क विवाह लावणे.

सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक व शैक्षणिक दृष्ट्या मागासलेल्या पुरुष व महिलांच्या आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक विकासाच्या प्रक्रियेला चालना देण्यासाठी योजना आखणे व राबविणे.

२. राष्ट्रीय कार्यक्रमाअंतर्गत लोक कल्याणकारी शासकिय योजना राबविणे.

३. समाजाची आर्थिक उन्नती व्हावी यासाठी प्रशिक्षण शिबीरे, चर्चासत्रे, प्रबोधनपर कार्यक्रमाचे आयोजन करणे. औद्योगिक प्रकल्प उभारण्याकरिता प्रशिक्षण देऊन रोजगार मार्गदर्शन केंद्र, रोजगार केंद्र उभारणे व चालविणे. सर्व सामान्य लोकापर्यंत गाव पातळीवर संगणक शिक्षण पोहचेल असा उपक्रम राबविणे. संगणक, वैद्यकीय, कायदेविषयक परिषदेची स्थापना करणे. महिला, कृषी, पशुविज्ञान, आरोग्य विज्ञान, आयुर्वेद, मुक्त विद्यापिठाची स्थापन करणे. रात्र शाळा, महाविद्यालये, संगणक साक्षरता वर्ग चालविणे. तसेच संगणकावर आधारित शासन मान्यता प्राप्त अभ्यासक्रम चालविणे.

४. व्यवसाय प्रशिक्षण उपक्रम, स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्र व महिला तक्रार निवारण केंद्राची स्थापना करुन चालविणे.

५. अनाथाश्रम, विधवाश्रम, वृध्दाश्रम, धर्मार्थ दवाखाना, वसतीगृह, ग्रामीण रुग्णालय, एड्स, मलेरिया व कृष्ठरोग निर्मुलन केंद्र, व्यसन मुक्ती केंद्र, कुटूंब कल्याण केंद्र व आरोग्य प्रशिक्षण चालविणे. अंधश्रध्दा निर्मुलन, महिला जनजागृतीपर कार्यक्रम राबविणे तसेच अनाथ बालकाश्रम व अनाथ, महिलाश्रम चालविणे.

६. ग्रामविकास, बालविकास, युवक कल्याण कार्यक्रम घेणे.

७. कुटूंब कल्याण कार्यक्रम, पल्स पोलियो,काविळ, पर्यावरण संतुलन, वृक्षारोपण, रक्तदान, पाणलोट, जलसंधारण, एड्स जनजागृती व निवारण, महिला बाल संगोपण, लसीकरण कार्यक्रम राबविणे व शिबीरे घेणे व लोकांमध्ये व्यसनविरोधी जागृती निर्माण करणे. तसेच धर्मार्थ दवाखान्याची स्थापना करुन चालविणे.

८. बालकांसाठी निरीक्षण गृह, बालगृह, बालसदन, अनाथालय, निराधार व निराश्रीत बालकांसाठी बालकाश्रम, बहुउद्देशिय सामुहीक केंद्र, बालमार्गदर्शन केंद्र, बाल संगोपन योजना, दत्तक योजना स्थापन

अध्यक्ष उपाध्यक्ष सचिव

करुन चालविणे.

९. महिलांच्या विकासासाठी महिला मार्गदर्शन केंद्रे स्थापन करुन त्यामार्फत वृध्दाश्रम, अनाथाश्रम, महिला आधार केंद्र, माता-बाल संगोपन केंद्र, कृष्ठाश्रम, भिकारी निर्मुलन, बालकामगार प्रथा, निर्मुलन, व्यसन मुक्ती, हुंडाबंदी, महिलांचे पुनर्वसन संकल्पनांची पुर्तता करणे. निशुल्क विवाह समारंभाचे आयोजन करणे.

१०. जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, जिल्हा परिषद, पंचायत समिती, एकात्मीक महीला बाल प्रकल्प, सल्लागार बोर्ड, समाज कल्याणाच्या विविध योजना राबविणे.

११. संस्थेच्यावतीने केंद्र शासनाच्या सामाजिक न्याय विभाग, महिला व बाल कल्याण, आदिवासी विकास विभागाच्या कल्याणकारी योजना संस्थेच्या कार्यक्षेत्रात राबविणे.

**शैक्षणीक उद्देश :-**

१. माध्यमिक शाळा, प्राथमिक शाळा, कला, वाणिज्य व विज्ञान (कनिष्ठ तथा वरिष्ठ) महाविद्यालय नृत्यकला विद्यालय, शिवनकला विद्यालय, पुनर्वसन केंद्र स्थापन करुन त्यांना शिक्षणाच्या सोई उपलब्ध करुन देणे. बालकमंदीर, इंग्रजी, मराठी, उर्दु, पुर्व माध्यमिक शाळा, होमिओपॅथी, विधी, आयुर्वेदिक, वैद्यकीय, अभियांत्रिकी महाविद्यालय, तंत्रनिकेतन महाविद्यालय, किमान कौशल्यावर आधारित अभ्यासक्रम, अंध व अपंग विद्यालय, फार्मसी विद्यालय, व्यायाम शाळा, सैनिकी शाळा, आश्रम शाळा व संगीत विद्यालय चालविणे.

२. समाजात शिक्षणाचे प्रसारार्थ प्राथमिक बालकमंदीर, आंगणवाडी, बालवाडी, प्राथमिक माध्यमिक शाळा, ज्युनिअर कॉलेज, सिनीअर कॉलेज, तांत्रिक महाविद्यालय, मुला-मुलांकरिता शारीरिक शिक्षण संस्था, कॉन्व्हेंट, सि.बी.एस.ई पॅटर्न शाळा, बी.एड., डि.टी.एड., बी.पी.एड., सी.पी.एड., एम.एस.डब्ल्यु., होमिओपॅथी, आयुर्वेदिक, चित्रकला महाविद्यालय, मेडिकल, नर्सीग, डि.फॉर्म., बी.फॉर्म., बि.सी.ए., एम.सि.ए., एम.सी.एम.कॉलेजची तथा व्यवस्थापनाविषयक प्रशिक्षण देणारे विद्यालय, महाविद्यालय तथा अभ्यासक्रमाची स्थापना करुन चालविणे. तसेच एम.एस.बी.टी.ई. तथा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण बोर्डाद्वारे चालविण्यात येणारे अभ्यासक्रम संस्थेच्यावतीने चालविणे.

३. समाजातातील विद्यार्थी- विद्यार्थीनीसाठी स्पर्धात्मक परिक्षेचे केंद्र स्थापन करुन मार्गदर्शन करणे, रिसर्च सेंटर स्थापन करुन संशोधन करणे, समाज कल्याण, युवक कल्याण, नेहरु युवा केंद्र, महिला व बाल विकास प्रकल्पाच्या कल्याणकारी योजना राबविणे.

४. मागासवर्गीय अनुसूचित जाती-जमाती, भटक्या जमातीकरिता आदिवासी आश्रमशाळा, पोस्ट बेसिक आश्रमशाळा, अनाथालय, वसतीगृह स्थापन करुन आदिवासी युवा कल्याणासाठी राज्य शासनाच्या व केंद्र शासनाच्या प्रत्येक योजना राबविणे.

५. महिलांचे उन्नतीकरिता महिला प्रशिक्षण केंद्र स्थापन करुन महिलांना स्वावलंबी बनविण्याकरिता व्यावसायिक प्रशिक्षण देणे. महिला संस्कार केंद्र, देवदासी, निराधार, निराश्रीत, घटस्फोटीत, हुंडाबळी,महिलांकरिता व्यावसायीक प्रशिक्षण केंद्र स्थापन करुन प्रशिक्षित करणे. मुलींना स्वःतच्या सरंक्षणासाठी कराट्यांचे प्रशिक्षण दिले जाईल.

६. अपंग, अंध, मुक-बधिर मुलां-मुलींकरिता अनाथालय, निवासी शाळा, आश्रमशाळा स्थापन करुन चालविणे.

अध्यक्ष उपाध्यक्ष सचिव

७. महिलांसाठी गृहउद्योग, कुटीरउद्योग, शिवणकला, विणकाम, हस्तकला, गायन कला प्रशिक्षण, भरतकाम, संगणक, सौंदर्यशास्त्र, टंकलेखन, पेंटींग चित्रकला, स्क्रिन प्रिंटींग, ब्युटी पार्लर, बेकींग, गृह विज्ञान, बांबुकाम या उद्योगाबाबत प्रशिक्षण केंद्र चालविणे.

**आरोग्य व पर्यावरण उद्देश :-**

१. प्यारलेसिस (लकवा), अंध अपंग, मुक-बधीर व्यक्तींना आरोग्य विषयक सोयी-सुविधा पुरविणे.त्यांना योग्य व चांगल्या प्रकारचे आरोग्य विषयक सोयी सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी आरोग्य मेळावे, आरोग्य तपासणी शिबीराचे आयोजन करणे. त्यामधून त्यांना लागणारा औषधोपचार विनामुल्य देणे. वेळोवेळी येणाऱ्या आरोग्य विषयक समस्यांवर जनजागृती निर्माण करण्यासाठी व्याख्याने, चर्चासत्र, जनहितार्थ संदेश देणे. एडस, कुष्ठ रोग, यासारख्या रोगांविषयी लोकांना माहीती देणे. जनजागृती निर्माण करणे. त्यांच्यासाठी केंद्र राज्य व आंतरराष्ट्रीय स्तरावरुन येणाऱ्या कल्याणकारी सोई-सुविधा मिळव्यात म्हणून प्रयत्न करणे. धर्मार्थ दवाखाने तसेच फिरते रुग्णालय सुरु करुन चालविणे. फॅमिली वेलफेअर अँड कॉन्सीलिंग, पर्सनॅलिटी डेव्हलपमेंट प्रोग्राम, मंदबुध्दी विकास प्रोग्राम, सिकलसेलअवरनेस प्रोग्राम, व्यसनमुक्ती कार्यक्रम राबविणे.

२. पर्यावरणविषयी लोकांमध्ये जनजागृती निर्माण करण्यासाठी कार्य करणे. पर्यावरण बचाव अंतर्गत वृक्षारोपन, रोपवाटीका, योजना यासारख्या योजना संस्थेच्या कार्यक्षेत्रात राबविणे.

**युवक, क्रीडा व सांस्कृतिक उद्देश :-**

१. युवक कल्याणार्थ युवा दर्शन कार्यक्रम, युवामंच, युवक नेतृत्व शिबीर, श्रमदान, युवक मेळावे यांचे आयोजन करणे. युवकांना मार्गदर्शनात्मक चर्चासत्रे, संमेलने, व्याख्याने, परिसंवाद, व्यक्तीपरियाचे आयोजन करुन त्याद्वारे युवा विकास घडवून आणण्याचा प्रयत्न करणे.

२. खेळाडूंना राज्य, राष्ट्रीय तथा आंतरराष्ट्रीय पातळीवर निवड व्हावी म्हणून विशेष प्रयत्न करणे.त्यासाठी ठिक-ठिकाणी शिबीरे, प्रशिक्षण केंद्रे, मार्गदर्शन केद्रांची स्थापना करुन चालविणे. शालेय जीवनापासून विद्यार्थ्यांना त्याविषयी मार्गदर्शन देण्यासाठी शाखा-उपशाखांची निर्मिती करुन त्याद्वारे विद्यार्थी विकास साधने.

३. संस्थेच्यावतीने व्यायामशाळेची स्थापना करुन खेळाडु तथा व्यायाम पटुंना मार्गदर्शन करणे.

४. कुशल/बकुशल आदिवासी युवा बेरोजगार, कारागीर, श्रमींकासांठी रोजगार उपलब्धतेकरीता प्रशिक्षण/प्रशिक्षण शिबीरे आयोजित करुन युवा सबळीकरणाकरीता कार्य करणे. तसेच याकरीता शासनाकडून वेळोवेळी सुचविलेल्या विकासात्मक उपाययोजना शासनाचे मार्गदर्शनाखाली राबविणे.

५. शिक्षण क्षेत्रातील खेळाचे महत्व लक्षात घेऊन शालेय जीवनाचत खेळाविषयी विशेष प्रशिक्षण शालेय विद्यार्थ्यांना देणे. तसे संस्कार बाल जीवनात / शिक्षण जीवनात रुजविण्यासाठी विशेष प्रयत्न करणे. शालेय जीवनात अशा प्रकारचे संस्कार रुजवण्यासाठी विशेष कार्यशाळा, प्रशिक्षण शिबीरे, व्याख्यानमाला, चर्चासत्रांचे आयोजन करणे.

अध्यक्ष | उपाध्यक्ष | सचिव

. **"किरण फॉऊंडेशन, चंद्रपूर"** या संस्थेच्या नियम व नियमावली प्रमाणे या कार्यकारी मंडळावर सदरहु संस्थेची व्यवस्था व कारभार सोपविण्यात आलेला आहे. अशा कार्यकारी मंडळाच्या सभासदाचे संपुर्ण नाव, पत्ता, पद, वय, राष्ट्रीयत्व व व्यवसाय पुढील प्रमाणे आहे :-

| अ.क्र. | सभासदाचे नाव व पत्ता | हुद्दा | वय | शिक्षण | व्यवसाय | राष्ट्रीयत्व |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | **कु. किरण पुंडलिक इंदुरकर**<br>मु.पो.ता.आरमोरी, जि.गडचिरोली | अध्यक्ष | २७ | बी.ए.,<br>डी.एड. | गृहिणी | भारतीय |
| २. | **कु. सिमा बिबुदास मुळे**<br>मु.पो.नेहरु नगर, ता.जि.चंद्रपूर | उपाध्यक्ष | २५ | एच.एस.सी.,<br>डी.एड. | व्यापार | भारतीय |
| ३. | **श्री. मिलिंद माणिक डोंगरे**<br>मु.पो.ब्रम्हपूरी, ता.ब्रम्हपूरी, जि.चंद्रपूर | सचिव | ३४ | एम.ए.,<br>बी.एड. | समाजसेवा | भारतीय |
| ४. | **कु. बबली सुभाष मुळे**<br>मु. पो. देवाळा, ता.जि.चंद्रपूर | सहसचिव | २९ | बी.ए.,<br>बी.एड. | व्यापार | भारतीय |
| ५. | **श्री. आशिष दिलीप खोब्रागडे**<br>सिस्टर कॉलरी, चंद्रपूर | कोषाध्यक्ष | २८ | एम.बी.ए. | नोकरी | भारतीय |
| ६. | **कु. प्रभृध्द सुभाष मुळे**<br>मु. पो. देवाळा, ता.जि.चंद्रपूर | सदस्य | २१ | एच.एस.सी.,<br>आय.टी.आय. | नोकरी | भारतीय |
| ७. | **सौ. रंजना नरेंद्र नगराळे**<br>शास्त्री नगर, चंद्रपूर | सदस्य | ३९ | बी.ए. | गृहिणी | भारतीय |

अध्यक्ष उपाध्यक्ष सचिव

आम्ही खाली सह्या करणारे सभासद जाहीर करतो की, संस्था नोंदणी अधिनियम १८६० अन्वये अभिप्रेत केलेली संस्था अस्तित्वात आणण्याची आमची इच्छा असून वरील उद्देशाने आम्ही आज दि २२/०७/२०१४ एकत्र येऊन **"किरण फॉऊंडेशन, चंद्रपूर"** ही संस्था नोंदणी अधिनियम १८६० अन्वये नोंदणी करण्यासाठी आम्ही या विधान पत्रावर सह्या केल्या आहेत.

| अ.क्र. | सभासदाचे नाव व पत्ता | स्वाक्षरी |
|---|---|---|
| १. | **कु. किरण पुंडलिक इंदुरकर**<br>मु.पो.ता.आरमोरी, जि.गडचिरोली | |
| २. | **कु. सिमा बिबुदास मुळे**<br>मु.पो.नेहरु नगर, ता.जि.चंद्रपूर | |
| ३. | **श्री. मिलिंद माणिक डोंगरे**<br>मु.पो.ब्रम्हपूरी, ता.ब्रम्हपूरी, जि.चंद्रपूर | |
| ४. | **कु. बबली सुभाष मुळे**<br>मु. पो. देवाळा, ता.जि.चंद्रपूर | |
| ५. | **श्री. आशिष दिलीप खोब्रागडे**<br>सिस्टर कॉलरी, चंद्रपूर | |
| ६. | **कु. प्रभृध्द सुभाष मुळे**<br>मु. पो. देवाळा, ता.जि.चंद्रपूर | |
| ७. | **सौ. रंजना नरेंद्र नगराळे**<br>शास्त्री नगर, चंद्रपूर | |

CERTIFIED TO BE TRUE COPY

Superintendent 3/07/14

Public Trust Registration Office Chandrapur Region, Chandrapur

दिनांक : २२/०७/२०१४

Typed by

Read by

Compaird by

NOTARIAL NOTARIAL NOTARIAL NOTARIAL NOTARIAL

CANCELLED

D. R. Pathak, Advocate Notary (Govt. of India)

ATTESTED

D. R. Pathak, Advocate
Notary (Govt. of India)
Regd. No.
28/11/2014

वरील सर्व सह्या करणाऱ्या लोकांशी मी ओळखतो त्यांनी माझ्या समक्ष या विधानपत्रावर सह्या केल्या आहेत.

विशेष कार्यकारी दंडाधिकारी/वकील/ सनदी लेखापाल / नोटरी/ संपूर्ण नाव, पत्ता व शिक्का

अध्यक्ष उपाध्यक्ष सचिव

The copy was applied for on..07/06/14
The copy was ready for delivery on 29/5/14
The copy was delivered & the order made on...3/7/14

Copy
Superintendent 3/7/14
Public Trust Registration Officer
Chandrapur Region Chandrapur

- :: परिशिष्ट - क ::-

# "किरण फॉऊंडेशन, चंद्रपूर"

या संस्थेची

Registered Under Societies Registration Act 1860

- :: नियम व नियमावली :: MAH 4L 198 Dt 26/02/98

१. नियमावलीतील संदर्भीय शब्दांच्या व्याख्या :-

संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर नियम व नियमावलीतील व्याख्या करण्यात आलेल्या अर्थाने वापरण्यात आलेल्या आहेत.

१. संस्था :- "किरण फॉऊंडेशन, चंद्रपूर" या नावाने ओळखण्यात येईल.

२. कार्यकारी मंडळ :- कार्यकारी मंडळ म्हणजे "**किरण फॉऊंडेशन, चंद्रपूर**" कार्यकारी मंडळ.

३. अध्यक्ष :- अध्यक्ष म्हणजे "**किरण फॉऊंडेशन, चंद्रपूर**" या संस्थेचे अध्यक्ष समजले जाईल.

४. उपाध्यक्ष:- उपाध्यक्ष म्हणजे "**किरण फॉऊंडेशन, चंद्रपूर**" या संस्थेचे उपाध्यक्ष समजले जाईल.

५. सचिव :- सचिव म्हणजे "**किरण फॉऊंडेशन, चंद्रपूर**" या संस्थेचे सचिव समजले जाईल.

६. सहसचिव:- सहसचिव म्हणजे "**किरण फॉऊंडेशन, चंद्रपूर**" या संस्थेचे सहसचिव समजले जाईल.

७. कोषाध्यक्ष:- कोषाध्यक्ष म्हणजे "**किरण फॉऊंडेशन, चंद्रपूर**" या संस्थेचे कोषाध्यक्ष समजले जाईल.

८. सभासद :- सभासद म्हणजे "**किरण फॉऊंडेशन, चंद्रपूर**" या संस्थेचे सभासद समजले जाईल.

२. कार्यक्षेत्र :- या संस्थेचे कार्यक्षेत्र संपूर्ण महाराष्ट्र असे राहील.

३) सभासदत्व व त्याची नोंदणीची पध्दत :-

अ) संस्थेच्या कार्यक्षेत्रात राहणारी कोणतीही भारतीय व्यक्ती, ज्याचे/जिचे वय १८ वर्षामध्ये कमी नाही व ज्यांना संस्थेचे उद्देश व नियमावली मान्य आहे. अशा व्यक्ती या संस्थेचा/संस्थेची सभासद होण्यास पात्र राहील.

ब) सभासदत्वासाठी अशा व्यक्तीने संस्थेच्या सचिवाकडे लेखी अर्ज देणे आवश्यक राहील.

क) सभासदत्वासाठी प्राप्त झालेले अर्ज कार्यकारी मंडळाच्या बैठकीमध्ये निर्णयासाठी ठेवण्यात येतील. सभासद होऊ इच्छिणाऱ्या व्यक्तींना सभासद करुन घ्यावे किवा घेऊ नये याबाबतचा निर्णय कार्यकारी मंडळाच्या बैठकीमध्ये कार्यकारीमंडळाच्या एकूण ३/५ बहुमताने घेण्यात येईल व अशा व्यक्तीने या नियमावलीत निर्धारित करण्यात आलेली सभासद फी संस्थेच्या सचिवाकडे सुचना प्राप्त झाल्याचे तारखेपासून १५ दिवसाचे आत जमा करणे अनिवार्य राहील.

अध्यक्ष उपाध्यक्ष सचिव

ड) वरील नियम ३ प्रमाणे फि मिळाल्यानंतर संबधीत व्यक्तीच्या नावाची नोंद सभासद नोंदणी वहीमध्ये घेण्यात येईल. संस्था नोंदणी अधिनियम १८६० चे कलम १५ व संस्था नोंदणी (महाराष्ट्र) नियम १९७० मधील नियम १५ अनुसार सभासद नोंदणी वहीत अनुसूची एकच्या विहित नमुन्यात ठेवण्यांत येईल.

४. **सभासदाचे प्रकार :-**

संस्थेचे सभासद हे दोन प्रकारचे राहतील. ते पुढील प्रमाणे.

अ) **आजीव सभासद :-**

आजीव सभासदाची सभासद फी रुपये १००१/- देगणी देऊन किंवा त्यापेक्षा जास्त देनगी संस्थेला देऊन आजीव सभासद होता येईल.

ब) **साधारण सभासद :-**

साधारण सभासद फी वार्षीक रुपये ५०१/- वार्षीक वर्गणी देऊन होता येईल व त्याचे सभासदत्व एका वर्षासाठी राहील.

५. **सभासदत्व रद्द होणे :-**

संस्थेच्या सभासदाचे सभासदत्व खालील कारणास्तव रद्द होईल.

अ) कोणताही व्यक्ती आपल्या स्वखुशीने लेखी सुचना देवून सभासदत्व रद्द करता येईल. यावेळी संस्थेला दिलेली कोणत्याही प्रकारची रक्कम (देनगी, सभासद फी) अनामत व इतर शुल्क केव्हाही परत केल्या जाणार नाही. सभासदाने नियमित वार्षिक फी न भरल्यास व नियमांचे उल्लंघन केल्यास कोणत्याही प्रकारची आगावु सुचना न देता सभासदत्व रद्द करण्यात येईल.

ब) सभासद संस्थेच्या कार्यक्षेत्राबाहेर राहण्यास गेल्यास,

क) वार्षिक सभासद फि तीन महिन्यापेक्षा जास्त कालावधीसाठी थकीत ठेवल्यास,

ड) संस्थेच्या कामकाजात नशा व इतर कोणतेही मादक पदार्थ सेवन करुन गोंधळ करणाऱ्या सभासदाचे सदस्यत्व रद्द करण्यात येईल.

इ) संस्थेच्या हितास बाध्य होईल असे वर्तन करणाऱ्या सभासदास कार्यकारी मंडळाच्या ३/४ मताधिक्याने सभासदत्व रद्द करता येईल. मात्र असा अर्ज ठरावाची स्पष्ट सुचना देऊन सभा बोलाविली असली पाहिजे. ही सभा गणसंख्येच्या अभावी तहकुब होता कामा नये.

६. **सर्वसाधारण सभा, तिचे अधिकार व कार्य :-**

अ) वरील नियम ३ व ४ प्रमाणे नोंदणी झालेल्या सर्व सभासदांची मिळून सर्वसाधारण सभा बनेल. सर्वसाधारण सभेच्या बैठकीत सर्व सभासद भाग घेऊ शकतात. ज्या सभासदाकडे सभासद फी तीन महिन्यापेक्षा जास्त कालावधीसाठी थकीत आहे असा सभासद बैठकीत भाग घेऊ शकणार नाही. मात्र त्याने बैठकीपूर्वी थकीत सभासद फि रितसर जमा केल्यास तो बैठकीत भाग घेऊ शकेल.

ब) **सर्वसाधारण सभेचे अधिकार व कार्य खालील प्रमाणे राहतील :-**

१. कार्यकारी मंडळाने सादर केलेल्या वार्षिक अहवालास, हिशोब पत्रकास व वार्षिक अंदाज पत्रकास मंजूरी देणे.

२. संस्थेच्या नियम नियमावलीमध्ये सुधारणा, बदल करणे, कार्यकारी मंडळाची निवड करणे.

३. संस्थेच्या लेखी परिक्षणासाठी सनदी लेखापाल किवा अधिकृत लेखापरिक्षकाची नियुक्ती करणे.

४. संस्थेच्या कार्याबद्दल किंवा कार्यक्रमाबद्दल कार्यकारी मंडळास मार्गदर्शक सुचना देणे.

अध्यक्ष उपाध्यक्ष सचिव

५. सभासदत्व नाकारण्यात आलेल्या व्यक्तीने अर्ज केल्यास त्यावर विचार करुन निर्णय घेणे.

६. सर्वसाधारण सभेने घेतलेले निर्णय कार्यकारी मंडळावर व संस्थेच्या सर्व सभासदावर बंधनकारक राहतील.

७. **सर्वसाधारण सभेची सुचना व गणसंख्या :-**

अ) सर्वसाधारण सभेची वार्षिक बैठक प्रत्येक वर्षी मार्च/एप्रिल महिन्यात घेण्यात येईल.सर्वसाधारण सभेच्या बैठकीची सुचना बैठकीच्या कमीत कमी १० दिवसापुर्वी प्रत्येक सभासदास त्यांचे पत्त्यावर देण्यात येईल किंवा पोष्टाने पाठविण्यात येईल. तसेच संस्थेच्या कार्यालयाच्या नोटीस बोर्डवर सभेची सुचना देऊन नोटीस बुकवर स्वाक्षरी करुन सुचना देण्यात येईल.

ब) सर्वसाधारण सभेच्या बैठकीमध्ये एकूण सभासदाच्या २/३ सभासदांची उपस्थिती गणपुर्तीसाठी आवश्यक राहील. बैठकीच्या निर्धारित वेळेपासून अर्ध्या तासाचे आत गणपुर्तीसाठी आवश्यक असलेली सभासद संख्या एकत्र न आल्यास बैठक गणपुर्तते अभावी तहकूब करण्यात येईल. तहकूब झालेल्या बैठकीस गणपुर्तीचे बंधन राहाणार नाही. बैठक त्याच दिवशी त्याच ठिकाणी अर्ध्या तासानंतर घेण्यात येईल. त्या बैठकीस कोरमचे बंधन राहणार नाही.

८. **विशेष साधारण सभा तिचे कार्य :-**

वार्षिक सर्वसाधारण सभेशिवाय विशेष सर्वसाधारण सभा केव्हाही घेता येईल. विशेष साधारण सभेत संस्थेच्या नियम आणि नियमावलीत करावयाच्या सुधारणा, कार्यकारी मंडळाची निवडणूक व इतर तातडीची कामे विचारात घेण्यात येईल. विशेष साधारण सभेची सुचना व गणपुर्ती नियम क्र. ७ (अ) व ७ (ब) प्रमाणे राहतील.

९. **संस्थेचे कार्यकारी मंडळ, पदाधिकारी यांची रचना :-**

संस्थेचे कार्यकारी मंडळ एकूण ०७ सदस्यीय राहील. ज्यामध्ये खालील पदाधिकाऱ्यांचा समावेश राहील :-

| | | |
|---|---|---|
| अ) अध्यक्ष - ०१, | ब) उपाध्यक्ष - ०१, | क) सचिव - ०१, |
| ड) सहसचिव -०१, | इ) कोषाध्यक्ष - ०१, | इ) सदस्य - ०२. |

१०. **कार्यकारी मंडळाचा कार्यकाल व निवडणूकीची पध्दत :-**

अ) कार्यकारी मंडळाची निवडणूक प्रत्येक पाच वर्षांनी सर्व साधारण सभेत गुप्त मतदान पध्दतीने घेण्यात येईल.

ब) कार्यकारी मंडळावर निवडून आलेले सभासद ह्यांच्या मधून अध्यक्ष, उपाध्यक्ष, सचिव, सहसचिव, कोषाध्यक्ष व सदस्य यांची निवड करण्यात येईल.

क) कार्यकारी मंडळाचा कार्यकाल पाच वर्षाचा राहील. मात्र नविन कार्यकारी मंडळ निवडून येईपर्यंत कार्यकारी मंडळ कार्यरत राहील. कार्यकारी मंडळाची निवडणूक गुप्त मतदान पध्दतीने घेण्यात येईल.

११. **कार्यकारी मंडळाचे पदाधिकारी व त्यांची कामे :-**

अ) **अध्यक्ष**

१. कार्यकारी मंडळाच्या बैठकीचे व सर्वसाधारण सभेचे अध्यक्ष म्हणून काम पाहणे.

२. सर्व प्रकारच्या बैठकी बोलवणे बाबत संस्थेच्या सचिवास निर्देश देणे. निर्देशानुसार सचिवाने बैठक न बोलविल्यास स्वतः बैठक बोलावणे.

३. मतदानात समान मते पडल्यास निर्णायक मत देणे.

अध्यक्ष    उपाध्यक्ष    सचिव

४. संस्थेच्या नियमावलीनुसार तसेच मंजुर झालेल्या ठरावानुसार कार्य करणे व त्याची दक्षता घेणे व कामकाजाबाबत निर्देश देणे किवा कार्यवाही करणे.

५. कार्यकारी मंडळाच्या ठरावानुसार कर्मचाऱ्यांचे नियुक्ती, निलबंन व सेवा मुक्तीच्या आदेशावर सह्या करणे.

६. खर्चाची देयके मंजुर करणे, संस्थेच्या वतीने न्यायालयीन प्रकरणे किंवा कार्यालयीन पत्रव्यवहार सांभाळणे.

ब) **उपाध्यक्ष :-**

अध्यक्षाच्या अनुपस्थितीत त्याचे सर्व कार्य पार पाडणे. तसेच संस्थेच्या हिताच्या दृष्टीने आवश्यक ती कामे पार पाडणे.

क) **सचिव :-**

१. अध्यक्षांनी दिलेल्या निर्देशानुसार बैठक बोलावणे. सर्व बैठकीच्या कार्यवाहीची नोंद ठराव पुस्तकात घेणे व त्यावर अध्यक्षांच्या सह्या घेणे.

२. संस्थेचा पत्रव्यवहार करणे, संस्थेच्या आर्थिक व्यवहाराबाबतचे हिशोब नियमित ठेवण्यासाठी अध्यक्षाला आवश्यक ती माहिती देणे. हिशोब नियमित व योग्य प्रकारे ठेवण्यात आल्याची खात्री करणे.

३. सभासद नोंदणी वही व इतर नोंदवह्या अद्यावत ठेवणे.

४. संस्थेच्या कामावर देखरेख ठेवणे, तसेच मालमत्तेची निगा राखणे, संस्थेच्या दैनंदिन कामाच्या दृष्टीने आवश्यक ती सर्व कामे करणे.

५. संस्थेच्या कार्याबाबतचा वार्षिक अहवाल, हिशोब पत्रके व अंदाज पत्रके तयार करुन ती सर्वसाधारण सभेपुढे मांडणे.

ड) **सहसचिव :-**

सचिवांच्या अनुपस्थितीत सचिवांची कामे पाहणे. सचिवांना आवश्यक त्या कामी, ठिकाणी मदत करणे. संस्थेच्या हितार्थ कार्य करणे.

इ) **कोषाध्यक्ष :-**

संस्थेच्या जमा खर्चाचे तपशिल पाहणे. संस्थेचे ऑडीट सचिवांच्या मदतीने तयार करणे.

ई) **कार्यकारी मंडळाचे सभासद :-**

कार्यकारी मंडळाच्या सभेत व सर्वसाधारण सभेत उपस्थित राहणे, निवडणुकीच्या वेळी मतदान करणे व संस्थेच्या कामात आवश्यक ती मदत करणे.

**१२. <u>कार्यकारी मंडळाची सभा व मागणीची सभा :-</u>**

अ) संस्थेच्या कार्यकारी मंडळाची सभा तीन महिन्यातून एकदा घेणे आवश्यक राहील. संस्थेच्या कामाचे दृष्टीने आवश्यक असेल त्यावेळी सुध्दा कार्यकारी मंडळाची सभा घेण्यात येईल.

ब) कार्यकारी मंडळाच्या कमीत कमी ५ सभासदांनी कार्यकारी मंडळाची सभा बोलविण्याबाबत अध्यक्षांकडे लेखी मागणी केल्यास अध्यक्षांनी कार्यकारी मंडळाची सभा १५ दिवसाचे आत बोलावली पाहीजे. अध्यक्षांनी सभा न बोलावल्यास मागणी करणाऱ्या सभासदांपैकी कोणत्याही सभासदांचे सहीने अशी सभा बोलावू शकेल व उपस्थित सभासदांतून एकास सभाध्यक्ष म्हणून निवड करुन काम सुरु करु शकेल व त्या सभेत झालेले निर्णय सर्वांना बंधनकारक राहतील.

अध्यक्ष　　उपाध्यक्ष　　सचिव

१३. **कार्यकारी मंडळाच्या सभेची सुचना व गणसंख्या :-**

कार्यकारी मंडळाच्या सभेची सुचना कमीत कमी सात दिवस अगोदर कार्यकारी मंडळाच्या सर्व सभासदांना मिळाली पाहिजे. संस्थेच्या कार्यकारी मंडळाच्या सभेची सुचना नोटीस पुस्तकातून सर्व सभासदांना देण्यात येईल व संबधीतांची त्यावर सही घेण्यात येईल. सभासदांनी सही न केल्यास किंवा इतर परिस्थितीत सभेची नोटीस रजिस्टर्ड पोष्टाने पाठविण्यात येईल. नोटीसमध्ये तारीख, वेळ, स्थळ व सभेपुढील विषय स्पष्टपणे नमूद करण्यात येईल. कार्यकारी मंडळाच्या बैठकीत कार्यकारी मंडळाच्या एकूण सभासदांच्या २/३ सभासदांची उपस्थिती गणपुर्तीसाठी आवश्यक राहील. गणपुर्ती न झाल्यास ती बैठक स्थगीत करुन दुसऱ्या तारखेस बोलविण्यात येईल व या बैठकीस गणपुर्तीची आवश्यकता राहणार नाही.

१४. **कार्यकारी मंडळाच्या निवडणुकीची पध्दत :-**

कार्यकारी मंडळाची निवडणूक दर पाच वर्षांनी सर्व साधारण सभेत गुप्त मतदान पध्दतीने घेण्यात येईल. कार्यकारी मंडळाद्वारे निवडणूक अधिकाऱ्याची नियुक्ती प्रथम करण्यात येईल. निवडणूक अधिकाऱ्याची नियुक्ती झाल्यानंतर सदर निवडणूक अधिकारी नामांकन पत्र स्विकारणे त्याची छाणणी करणे, निवडणूकीस पात्र असलेल्या सभासदांची नावे जाहीर करणे, ही सर्व कामे पुर्ण करील. आवश्यकता असल्यास मतदान घेण्यात येईल व निवडणूक अधिकारी निवडुन आलेल्या सभासदांची नावे जाहिर करील.

१५. **कार्यकारी मंडळातील रिक्त पद भरण्याबाबत :-**

कार्यकारी मंडळातील सभासदांच्या /पदाधिकाऱ्यांच्या मृत्युमुळे किंवा त्यांनी राजीनामा दिल्यामुळे किंवा नियम ५ मध्ये नमूद केलेल्या कारणास्तव सभासदत्व रद्द झाल्यास कार्यकारी मंडळात रिक्त होणारी जागा कार्यकारी मंडळाच्या उर्वरित सभासदांच्या बहुमताने भरण्यात येईल व या प्रकारे निवड करण्यात आलेल्या सभासदांचा कार्यकाल त्या कार्यकारी मंडळाच्या कालावधी पुरता मर्यादित राहील.

१६. **कार्यकारी मंडळाचे अधिकार व कर्तव्ये :-**

१. सर्वसाधारण सभेच्या ठरावाची अंमलबजावणी करणे, संस्थेच्या अंतर्गत चालणाऱ्या शाखेवर व कार्यावर नियंत्रण ठेवणे.

२. संस्था व संस्थेद्वारा संचालित शाखामध्ये कर्मचाऱ्यांची नेमणूक करणे. त्यांच्यावर नियंत्रण ठेवणे, कर्मचाऱ्यांची बदली करणे बढती करणे, कामावरुन कमी करणे, संस्थेच्या उद्देशानुसार व नियमावलीनुसार कार्य चालविणे, तसेच दैनंदिन कामाबाबत नियम तयार करणे.

३. वेगवेगळ्या खात्यातर्फे विहित करण्यात आलेली माहिती त्या त्या खात्यास नियमित सादर करणे आवश्यक नोंद वह्या अद्यावत ठेवणे, संस्थेच्या आर्थिक व्यवहाराचे हिशोब ठेवणे व ते सक्षम लेखा परिक्षकांकडून तपासून घेणे व सर्वसाधारण सभेत मंजूरीस ठेवणे.

अध्यक्ष उपाध्यक्ष सचिव

१७. **हिशोबाचे वर्ष :-**

हिशोबाचे वर्ष १ एप्रिल ते ३१ मार्च असे राहील.

१८. **संस्थेचा निधी, मिळकत व विनीयोग :-**

संस्थेच्या सभासदांकडून मिळणारी सभासद फी संस्थेच्या दान अगर देणगी दाखल मिळणारी रक्कम शासनाकडुन मिळणारे अनुदान हा संस्थेचा निधी राहील.

१९. **उद्दिष्ट निहाय खर्चाची तरतूद :-**

संस्थेला मिळणारी रक्कम ही संस्थेच्या उद्देशावर खर्च करण्यात येईल. ती पुढील प्रमाणे शैक्षणिक - ४०%, सामाजिक व सांस्कृतिक - २०%, ग्रामीण व पर्यावरण - २०%, युवक कल्याण, क्रीडा व आरोग्य - २०%.

२०. **कर्ज किंवा ठेवी संबधी तरतुद :-**

संस्थच्या कामासाठी संस्थेला अतिरिक्त रक्कमची आवश्यकता भासल्यास कार्यकारी मंडळातील कोणत्याही पदाधिकारी, व्यक्तीकडुन कर्ज किंवा ठेव स्विकारता येईल. परंतु तसा ठराव कार्यकारी मंडळाच्या बहुमताने ठराव मंजुर करुन मा. धर्मदाय सह आयुक्त नागपूर यांची पुर्व परवानगी घेणे आवश्यक राहील.

२१. **बँक खाते :-**

संस्थेचे सर्व व्यवहार व संस्थेजवळ शिल्लक असलेली रक्कम कोणत्याही राष्ट्रीयकृत बँकेत संस्थेच्या नावाने ठेवता येईल. या खात्यावरचा व्यवहार अध्यक्ष, सचिव किंवा कोषाध्यक्ष यापैकी कोणत्याही दोन पदाधिकाऱ्यांच्या संयुक्त स्वाक्षरीने व्यवहार पुर्ण करण्यात येईल.

२२. **स्थावर मालमत्ता खरेदी विक्री करणे बाबत तरतुद :-**

संस्थेला मालमत्ता खरेदी/विक्री करण्याचे अधिकार राहील. संस्थेला त्याकरीता कार्यकारी मंडळाचे बहुमताने तसा ठराव पारित करुन संमती घ्यावी लागेल. तसेच संस्थेला मालमत्ता विक्री करावयाची असल्यास मा. धर्मदाय सह आयुक्त, नागपूर यांची पूर्व परवानगी घेणे आवश्यक राहील.

२३. **सभासदांची यादी ठेवण्याची पध्दत :-**

संस्था नोंदणी अधिनियम १८६० चे कलम १५ व संस्था नोंदणी (महाराष्ट्र) नियम १९७१ मधील नियम १५ प्रमाणे संस्थेच्या सभासदाची नोंदवही अनुसूचिसह वा विहीत नमुन्यात ठेवण्यात येईल.

२४. **नियम आणि नियमावलीत बदल करण्याची तरतुद :-**

संस्थेच्या नियम आणि नियमावलीत बदल सर्व साधारण सभेच्या बैठकीत एकूण सभासदांच्या ३/५ बहुमताने ठराव मंजूर करुन घेण्यात येईल १८६० चे संस्था नोंदणी अधिनियमचे कलम १२ प्रमाणे ही कार्यवाही पुर्ण करण्यात येईल.

अध्यक्ष उपाध्यक्ष सचिव

२५. **संस्थेच्या नावात व उद्देशा बदल करण्याची तरतुद :-**
संस्थेच्या उद्देशात किंवा नावात बदल करणे, तसेच संस्थेचे पुर्णतः किंवा अंशतः दुसऱ्या संस्थेत विलीनीकरण करावयावचे असल्यास १८६० चे संस्था नोंदणी अधिनियमचे कलम १२ व १२ अ प्रमाणे कार्यवाही पुर्ण करावी लागेल. तसेच नियम व नियमावलीत बदल करावयाचा असल्यास ३/५ बहुमतांने ठराव मंजुर करता येईल.

२६. **संस्थेचे विसर्जन :-**
संस्था नोंदणी अधिनियम १८६० चे कलम १३ व १४ मधील तरतुदीला अनुसरुन संस्थेचे विसर्जन ३/५ सभासदांच्या बहुमताने करता येईल. संस्थेची सर्व प्रकारची देणी व शिल्लक संस्थेचे बाकी व्यवहार पुर्ण करुन राहणारी संपत्ती संस्थेचे ३/५ सभासद ठरविल त्या प्रमाणे ती दुसऱ्या संस्थेस देण्यात येईल.

## -:: दा ख ला ::-

प्रमाणित करण्यात येते की, **"किरण फॉऊंडेशन, चंद्रपूर"** चे सभासद या संस्थेच्या नियम व नियमावलीची मुळप्रत आहे.

| अ.क्र. | सभासदाचे नाव | पद | स्वाक्षरी |
|---|---|---|---|
| १. | कु. किरण पुंडलिक इंदुरकर | अध्यक्ष | [signature] |
| २. | कु. सिमा बिबुदास मुळे | उपाध्यक्ष | [signature] |
| ३. | श्री. मिलिंद माणिक डोंगरे | सचिव | [signature] |

दिनांक :- 22/07/2078

ठिकाण :- चंद्रपुर

CERTIFIED TO BE TRUE COPY

Superintendent 3/7/14
Public Trust Registration Office
Chandrapur

Typed by
Read by 3/5
Compaird by

अध्यक्ष उपाध्यक्ष सचिव